| | |
|---|---|
| **CNR NO.MHSO160013922020** | दाखल दिनांक : २८/०९/२०२०<br>नोंदणी दिनांक : १२/१०/२०२०<br>निकाल दिनांक: ०५/०५/२०२६<br>कालावधी : ०५ व ०७ म ०७ दि. |

# न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, करमाळा, यांचे न्यायालय

(पीठासीन अधिकारी अ.कि.शर्मा)

| नियमीत फौजदारी खटला क्र.१९९/२०२०. | निशाणी क्र.५३/ब |
|---|---|
| **गुन्ह्याचा तपशील** | करमाळा पोलीस स्टेशन येथील गुन्हा क्र.४६६/२०२० भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ प्रमाणे |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासनतर्फे – पोलीस निरीक्षक, करमाळा पोलीस ठाणे. |
| **अभियोग पक्षातर्फे** | श्री.ए.एस.वाघमारे, सहा. सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी पक्ष** | **१. शिवाजी पोपट जगताप,** वय – ५० वर्षे, व्यवसाय – शेती,<br>**२. केशव शिवाजी जगताप,** वय – २१ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>**३. ओंकार शिवाजी जगताप,** वय – १९ वर्षे, व्यवसाय – शेती,<br>**४. लक्ष्मी शिवाजी जगताप,** वय – ४५ वर्षे,व्यवसाय – घरकाम,<br>**५. नुतन शिवाजी जगताप,** वय – २३ वर्षे, व्यवसाय – घरकाम, सर्व रा. वांगी नं.१, ता.करमाळा, जि.सोलापूर. |
| **आरोपी पक्षातर्फे** | विधीज्ञ श्री. के.व्ही.वीर |

| **गुन्ह्याचा तपशील** | | |
|---|---|---|
| गुन्ह्याची तारीख | : | २७/०४/२०२० |
| प्रथम खबरी अहवाल तारीख | : | २७/०४/२०२० |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र दाखल तारीख | : | २८/०९/२०२० |
| दोषारोपपत्र निश्चित तारीख | : | १२/१०/२०२० |
| पुरावा सुरू झाल्याची तारीख | : | १३/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | : | –––––– |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०५/०५/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | : | |

**आरोपीचा तपशील**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीन तारीख | गुन्हा कलम | निर्दोष सोडले किंवा शिक्षा दिली | शिक्षेचे स्वरूप | जेलमध्ये बंद असलेला कालावधी – कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **वरील प्रमाणे** | **आ.क्र.१ ते ५ दि.२१/८/२०** | **आ.क्र. १ ते ५ दि.१२/३/२६** | **वरील प्रमाणे** | **निर्दोष** | **–––** | **––** |

**अभियोग पक्षाचे साक्षीदार**

| **अ.क्र.** | **साक्षीदारांचे नावे** | **पुराव्याचे स्वरूप** |
|---|---|---|
| १ | तानाजी गोविंद जगताप | फिर्यादी |

फिर्यादी व आरोपींनी निशाणी २९ वरील तडजोड अर्ज व निशाणी ३० वर त्यांचे प्रकरण आपसात झाल्याबाबत तडजोड पुरसीस दाखल केली. पुराव्यादरम्यान अभियोगपक्षातर्फे खालील कागदापत्रांना निशाणी क्रमांक देण्यात आले.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्राचे स्वरूप |
|---|---|---|
| १ | ३८ | फिर्यादीची फिर्यादवरील डाव्या हाताच्या अंगठयाचे ठसे |
| २ | ३९ | फिर्यादीची गुन्हयाच्या प्रथम खबरी अहवालवरील डाव्या हाताच्या अंगठयाचे ठसे |

आरोपींतर्फे कोणताही लेखी अथवा तोंडी पुरावा दिलेला नाही. सहाय्यक सरकारी वकील श्री.ए.एस.वाघमारे यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच आरोपींतर्फे श्री. के.व्ही.वीर यांचा युक्तीवाद ऐकला.

**न्या य नि र्ण य**

(पारित दिनांक ०५ मे, २०२६)

**१.** आरोपी भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ प्रमाणे चालविण्यात आलेल्या खटल्याच्या अन्वये पात्र शिक्षेस आरोपी सामोरे जात आहेत.

**अभियोग पक्षाची हकीगत थोडक्यात खालीलप्रमाणे आहे :**

**२.** फिर्यादी तानाजी गोविंद जगताप यांनी करमाळा पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली की, ते वांगी नं.१, ता.करमाळा, जि.सोलापुर येथे त्यांच्या कुटुंबासह राहत असुन शेती करून ते त्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करत आहेत. दिनांक २७/०४/२०२० रोजी सायंकाळी ०६.३० वाजताचे सुमारास फिर्यादीच्या घरी आरोपी क्र.१ ते ५ हे फिर्यादी यांना शिव्या देत आले असता त्यावेळी फिर्यादी यांना आरोपी क्र.१ व आरोपी क्र.४ हे म्हणाले की, “तुझे शेतातील केळीची पाने, ऊसाचे पाचाट हे आमचे शेता येऊ देऊ नको” त्यावेळी फिर्यादी हे आरोपी क्र.१ व आरोपी क्र.४

यांना म्हणाले की, “माझे शेतात पण तुमचे कायसुद्धा येऊ देऊ नका” असे म्हणाले असता आरोपी क्र.१ व २ यांनी काठीने फिर्यादीच्या उजवे हाताचे अंगठयावर मारुन जखमी केले व आरोपी क्र.३ ते ५ यांनी हाताने व लाथाबुक्याने मारहाण करुन व शिवीगाळी, दमदाटी केली. त्यावेळी फिर्यादी मारहाणीत खाली पडले व "तुला बघुन घेतो” असे म्हणुन सर्व आरोपी निघुन गेले, ती वेळ ६.४५ वाजताची होती. त्यानंतर फिर्यादी यांनी बापुराव देविदास अवचर यांना फोन करुन घडलेला प्रकार सांगितला. त्यानंतर फिर्यादीने करमाळा पोलीस स्टेशन येथे फिर्याद नोंदविली.

**३.** फिर्यादीने दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे अधिकारी, करमाळा यांनी आरोपींचे विरोधात भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९, २६९, १८८ अन्वये तसेच आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कलम ५१ ब प्रमाणे शिक्षेस पात्र अपराध गुन्हा खतावणी क्र.४६६/२०२० वर नोंदविला. तपास अधिकारी यांनी गुन्ह्याचा तपास करुन साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले, पंचासमक्ष पंचनामा तयार केला व उक्त कलमान्वये शिक्षेस पात्र गुन्ह्याचा अंतिम अहवाल दाखल केला.

**४.** मी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यांचा दोषारोप नि.क्र.२१ वर निश्चीत केला व आरोपींची जबानी निशाणी २२ ते २६ नुसार नोंदविले. आरोपींनी त्यांच्या जबानी दरम्यान त्यांना गुन्हा कबुल नसल्याचे कथन करुन संपरिक्षेची मागणी केली. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अंतर्गत जबाब निशाणी ४८ ते ५२ नुसार नोंदविण्यात आले.

५. फिर्यादी अभियोग पक्षाचा मुख्य साक्षीदार होता. परंतु त्याने अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. त्यामुळे निशाणी क्र.१ वर आदेश पारीत करून अभीयोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अंतर्गत जबाब निशाणी क्र.४८ ते ५२ नुसार नोंदविण्यात आले. आरोपींच्या वकीलांनी नि.क्र.४० वरील घटनास्थळ पंचनामा, निशाणी क्र.४१ ते ४२ वरील वैदयकीय प्रमाणपत्र मान्य व कबूल केले. आरोपींनी त्याच्या वतीने कोणताही साक्षीदार तपासलेला नाही.

६. अभिलेखावरील उपलब्ध पुरावा आणि गुन्हयाचा तपशील पाहता, खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित झाले. त्या प्रत्येक मुद्दयांचे निष्कर्ष मी नोंदविले असून, त्यांची कारणमिमांसा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतात काय की, दि.२७/०४/२०२० रोजी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास वांगी नं.१, ता.करमाळा येथील फिर्यादीचे शेतात आरोपी क्र.१ ते ५ यांनी समान उद्देशाचे पूर्तीसाठी बेकायदेशीर जमाव जमविला व त्यावेळी आरोपी बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते? | .....नाही. |
| २. | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्देशाचे पुर्तीसाठी हातात लाठया काठया घेऊन जमाव केला होता का ? | .....नाही. |
| ३. | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी | |

| | | |
|---|---|---|
| | जमवुन समान उद्देशाचे पुर्तीसाठी फिर्यादी यांना काठीने उजव्या हाताच्या अंगठयावर मारून गंभीर दुखापत करून ईजा केली का? | .....नाही. |
| ४. | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्देशाचे पुर्तीसाठी फिर्यादी यांच्या जीव घेण्याच्या उद्देशाने काठीने मारहाण करून इच्छापूर्वक गंभीर शारीरीक दुखापत पोहोचवली? | .....नाही. |
| ५. | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्देशाचे पुर्तीसाठी फिर्यादी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून दुखापत पोहोचवली? | .....नाही. |
| ६. | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्देशाचे पुर्तीसाठी फिर्यादी यांना ते सार्वजनिक शांतता भंग करतील या करिता प्रोत्साहित करून, शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला काय? | .....नाही. |
| ७. | अभियोग पक्ष पुढे हे सिध्द करतो काय की, वर नमूद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्देशाचे पुर्तीसाठी फिर्यादी यांना धाकदपटशा दमदाटी करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली? | .....नाही. |
| ८. | कोणता आदेश ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

## – : **कारणमिमांसा** :–

**<u>मुद्दे क्र.१ ते ७ बाबत</u>** :

७. वरील सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असलेने एकत्रीतपणे चर्चेसाठी घेण्यात आले आहे. जेणेकरून प्रस्तुत न्यायनिर्णयावर पुनरार्वत्ती होऊ नये.

८. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी, तानाजी गोविंद जगताप, (सा.क्र.१) यांना निशाणी ३७ वर तपासण्यात आले. फिर्यादीने त्यांच्या सरतपासात ते आरोपींना गावनात्याने ओळखत असल्याचे सांगितले. तसेच त्यांना घटनेबाबत काही आठवत नसल्याचे सांगितले. फिर्यादीने पुढे त्यांच्या सरतपासात घटनेची तारीख व वेळ सांगता येत नसल्याचे, घटना काय घडली हे आठवत नसल्याचे सांगितले. तसेच घटना किरकोळ कारणावरून त्यांनी आरोपींविरूध्द करमाळा पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याचे, जबानी रिपोर्ट (नि.क्र.३८) व छापील प्रथम खबर (नि.क्र.३९) वर त्यांच्या डाव्या हाताच्या अंगठयाचे ठसे असल्याचे व त्यातील मजकुराबाबत त्यांना सांगता येत नसल्याचे सांगितले. तसेच, पोलीसांनी त्यांना घटनेबाबत विचारपूस करून त्यांचे बयान नोंदविले नसल्याचे सांगितले.

९. फिर्यादी अभियोगपक्षाचा मुख्य साक्षीदार होता. परंतु त्यांनी अभियोग पक्षाला सहकार्य केलेले नाही. सहाय्यक सरकारी वकिलांनी उलटतपास च्या स्वरूपात प्रश्न विचारून अभियोग पक्षाला सहकार्य होईल अशी कुठलीच बाब अभिलेखावर आणलेली नाही. फिर्यादीने त्यांच्या उलटतपासात जबानी रिपोर्ट निशाणी ३८ व छापील प्रथम खबर निशाणी ३९ मधील अधोरेखांकित भाग अ चुकीचा असलेचे व पोलीसांनी तसे का लिहिले याचे काही कारण त्यांना सांगता येणार नसल्याचे सांगितले. फिर्यादीने पुढे त्याच्या उलटतपासात घटनेच्या वेळेस आरोपी क्र.१ व २ ने फिर्यादी यांना काठीने

फिर्यादीच्या उजव्या हाताच्या अंगठयावर मारहान केले असल्याचे नाकारले. तसेच आरोपी क्र.३ ते ५ यांनी फिर्यादी यांना हाताने व लाथाबुक्याने मारहाण करून शिवीगाळ व दमदाटी केली असल्याचे नाकारले. फिर्यादीने पुढे त्याच्या उलटतपासात नि.क्र.२९ वरील तडजोड अर्ज व ३० वरील तडजोड पुरसीसवर फिर्यादीच्या डाव्या हाताच्या अंगठयाचे ठसे असल्याचे व आरोपींची सही व डाव्या हाताच्या अंगठयाचे ठसे असल्याचे मान्य केले तसेच त्यातील मजकूर खरा व बरोबर असल्याचे सांगितले. तसेच पुढे त्यांना आरोपींविरूध्द केस चालवायची नसल्याचे सांगितले.

**१०.** फिर्यादी अभियोग पक्षाचा मुख्य साक्षीदार होता. परंतु त्याने अभियोग पक्षाल सहकार्य केलेले नाही. सहाय्यक सरकारी वकिलांनी उलटतपासाच्या स्वरूपात प्रश्न विचारून अभियोग पक्षाला सहकार्य होईल अशी कुठलीच बाब अभिलेखावर आणलेली नाही. फौजदारी खटल्यात कुठलाही गुन्हा शंकेपलीकडे सिद्ध करण्याची जबाबदारी अभियोग पक्षाची आहे. अभियोग पक्षाने दिनांक २७/०४/२०२० रोजी सायंकाळी ६.३० वाजेच्या सुमारास वांगी नं.१, ता.करमाळा येथील फिर्यादीचे शेतात आरोपी क्र.१ ते ५ यांनी समान उद्देशाचे पूर्तीसाठी बेकायदेशीर जमाव जमविला व त्यावेळी आरोपी बेकायदेशीर जमावाचे सदस्य होते तसेच आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्धेशाचे पुर्तीसाठी हातात लाठया काठया घेऊन जमाव केला होता तसेच आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्धेशाचे पुर्तीसाठी फिर्यादी यांना काठीने उजव्या हाताच्या अंगठयावर मारून गंभीर दुखापत करून ईजा केली तसेच आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्धेशाचे पुर्तीसाठी फिर्यादी यांच्या जीव घेण्याच्या उद्धेशाने काठीने मारहाण करून इच्छापूर्वक गंभीर शारीरीक दुखापत पोहोचवली तसेच

आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्देशाचे पुर्तीसाठी फिर्यादी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून दुखापत पोहोचवली तसेच आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्देशाचे पुर्तीसाठी फिर्यादी यांना ते सार्वजनिक शांतता भंग करतील या करिता प्रोत्साहित करून, शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला तसेच आरोपींनी गैरकायदेशीर मंडळी जमवुन समान उद्देशाचे पुर्तीसाठी फिर्यादी यांना धाकदपटशा दमदाटी करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली ही बाब सिध्द केलेली नाही त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ७ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.८ करीता :**

**११.** मी मुद्दा क्र.१ ते ७ चे निष्कर्ष वरीलप्रमाणे नकारार्थी नोंदविलेले आहेत. आरोपींना फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७ अ प्रमाणे पुढील सहा महिन्याच्या कालावधीकरीता जामीन देणे आवश्यक आहे. म्हणुन मी मुद्दा क्र.८ च्या अनुषंगाने पुढील आदेश पारीत करीत आहे.

**– : आदेश :–**

| | |
|---|---|
| १. | **आरोपी क्र.१ शिवाजी पोपट जगताप, क्र.२ केशव शिवाजी जगताप, क्र.३ ओंकार शिवाजी जगताप, क्र.४ लक्ष्मी शिवाजी जगताप, क्र.५ नुतन शिवाजी जगताप** यांना यांची भारतीय दंड विधान कलम ३२६, ३२४, ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ या शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयातून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) प्रमाणे निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींचे जामिनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येते. |

| | |
|---|---|
| ३. | आरोपींनी प्रस्तूत न्यायनिर्णयावर अपील झाल्यास अपीलामध्ये हजर होण्यासंदर्भात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७–अ प्रमाणे रुपये १५,०००/– चे बंधपत्र प्रत्येकी दाखल करावेत. |
| ४. | जप्त मुद्देमाल दोन लाकडी काठी मुल्यहीन असल्यामुळे अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा. |
| | ( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात येत आहे.) |

AMIT KISHORE SHARMA
Digitally signed by AMIT KISHORE SHARMA
Date: 2026.05.05 13:01:03 +0530

दिनांक – ०५/०५/२०२६
करमाळा.

(अ.कि.शर्मा)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, करमाळा.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file order is same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| (a) Name of the Stenographer | :- | Rutuja D. Gore |
| (b) Court | :- | Jt.CJJD & JMFC, Karmala |
| (c) Order signed by P.O. on | :- | 05/05/2026 |
| (d) Order uploaded on | :- | 05/05/2026 |